**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ७२/२०२६.**
**मनोहर पि. विश्वनाथ बोर्डे वि. निरंक**
**CNR No : MHBI130003102026.**
**:: निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश ::**

प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केला आहे.

**०२.** अर्जदाराचे वडील नामे **विश्वनाथ आत्माराम बोर्डे** हे दिनांक ०५/०३/१९९६ रोजी मौजे परळी वै., ता. परळी वै., जि. बीड येथे मयत झाले आहेत. मयत **विश्वनाथ आत्माराम बोर्डे** यांची पत्नी म्हणजेच अर्जदाराची आई नामे पार्वती भ्र. आत्माराम बोर्डे हया देखील पूर्वीच मयत झाल्या आहेत. अर्जदार हा मुलगा या नात्याने मयताचा एकमेव कायदेशिर वारस असुन मयतास अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. अर्जदारास विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयात दाखल करण्यासाठी कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**०३.** प्रकरणात आदेश पारीत करून दिनांक ०६/०२/२०२६ रोजीचे दैनिक **"वैद्यनाथ वार्ता"** या वर्तमानपत्रात सदर प्रकरणाबाबत जनतेस जाहीर नोटीस बजाविण्यात आले. त्या वर्तमानपत्राची आवृत्ती नि. ०८ वर अभिलेखावर दाखल आहे.

**०४.** अर्जदार यांनी त्यांचा पुरावा निशाणी क्र. ०९ प्रमाणे अभिलेखावर दाखल केला आहे. अर्जदाराची पुरावा संपल्याची पुरसीस निशाणी क्र. १० वर आहे. अर्जदार हाच मयत **विश्वनाथ आत्माराम बोर्डे** यांचा एकमेव कायदेशिर वारस आहे. अर्जदाराने मयत **विश्वनाथ आत्माराम बोर्डे** यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र. ०६ वर, कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र नि.क्र. ०७ वर, तसेच अर्जदार याने त्याचे आधार कार्डची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे.

०५. जनतेस जाहीर नोटीस देवुन सुध्दा आजपावेतो वारसप्रमाणपत्र देण्याबाबत कोणतेच आक्षेप न्यायालयास प्राप्त झाले नाही. म्हणुन अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरून अर्जदार हाच मयताचा एकमेव कायदेशिर वारस असल्याचे दिसुन येते. म्हणुन खालील आदेश पारीत.

**:: आदेश ::**

**०१.** अर्ज मंजुर.

**०२.** न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ मधील अपेन्डीक्स-बी प्रमाणे **अर्जदार मनोहर पि. विश्वनाथ बोर्डे** यांना मयत **विश्वनाथ आत्माराम बोर्डे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

**०३.** बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ अन्वये दिल्या जाणा-या प्रमाणपत्रासोबत दिवाणी नियमावली परिच्छेद ३१२ मध्ये दिलेल्या सुचना जोडाव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Date: 2026.03.12 12:24:21 +0530

दिनांक – १२/०३/२०२६.
ठिकाण - परळी वैजनाथ.

**( डी. वाय. रायरीकर )**
सहदिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)
परळी वैजनाथ

---

:: **Certificate of Stenographer** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order."

Dictated On : 12/03/2026.
Transcribed On : 12/03/2026.
Checked & Signed On : 12/03/2026.

Date : 12/03/2026.
Place : Parli Vaijnath.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by GUPTA SACHIN SATISH
Date: 2026.03.12 12:25:59 +0530

**( Sachin S. Gupta )**
Stenographer (Grade – 3)
Civil Court (Junior Division) & J.M.F.C.
Parli Vaijnath (MHBI-13)